# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**जालना जिल्ह्यातील लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) या कार्यालयातील गैरप्रकाराबाबत**

**(१) २०९१ (२२-१२-२०१४). श्री.भाऊसाहेब पाटील - चिकटगांवकर (वैजापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) या कार्यालयातील गैरप्रकाराबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी परतूर एसडीओच्या पथकांची तपासणीसाठी नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अहवाल प्राप्त झाला आहे काय, अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०८-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) जिल्हाधिकारी, जालना यांनी उपविभागीय अधिकारी, परतूर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली, या समितीत तपासणीसाठी दोन पथके गठीत करण्यात आली कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जालना यांचे नियंत्रणाखालील पथक क्र. १ ने एकूण ४० कामांचा अहवाल अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचे मार्फत जिल्हाधिकारी जालना यांचेकडे सादर केला आहे. जिल्हाधिकारी यांनी दि. १६/०४/२०१५ च्या पत्रान्वये या कामांचा निलंबन निधी निश्चित करण्यासाठी कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (राज्यस्तर) यांची नियुक्ती केली असून त्यांचेकडून या ४० कामांबाबत निलंबन निधी निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

कार्यकारी अभियंता लघु पाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांचे नियंत्रणखालील पथक क्र. २ ने ५१ कामांचा अहवाल अधीक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचेकडे सादर केला. तथापि त्यामध्ये असलेल्या त्रुटीची पूर्तता करण्यासाठी सदर अहवाल कार्यकारी अभियंता ल.पा.विभाग जिल्हा परिषद, जालना यांचेकडे परत पाठविण्यात आला आहे. त्यानुसार त्रुटीची पुर्तता करण्याची कार्यकारी अभियंता ल.पा. विभाग जिल्हा परिषद, जालना यांचे स्तरावर सुरु आहे.

---

**वाशिम जिल्हयातील मालेगाव येथे आदिवासी बांधवांसाठी सांस्कृतिक सभागृह बांधकामाकरिता पंचायत समिती परिसरातील जागा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२) ४२७५ (२२-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील मालेगाव येथे आदिवासी बांधावांच्या लोककला, सामुदायिक लग्न, परंपरागत सण, उत्सव साजरे करण्यासाठी सांस्कृतिक भवन बांधकामासाठी मालेगाव पंचायत समिती परिसरातील १ एकर जागा तत्कालीन लोकप्रतिनीधी व प्रकल्प अधिकारी, एका आदीवासी विकास प्रकल्प अकोला यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषद वाशिम यांच्याकडून सदर जागा एका आदीवासी विकास प्रकल्प, अकोला यांना देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०२-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

वाशिम जिल्हयातील मालेगाव येथे आदिवासी बांधवाच्या लोककला, सामुदायिक लग्न, परंपरागत सण, उत्सव साजरे करण्यासाठी सांस्कृतिक भवन बांधकामाकरिता पंचायत समिती परिसरातील १ एकर जागा उपलब्ध करुन देण्याबाबत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांनी दिनांक २६.२.२०१३ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती मालेगाव, जि.वाशिम यांच्याकडे मागणी केली होती.

आदिवासी विकास महामंडळ सभागृह बांधकाम करण्यास १ कोटी निधी उपलब्ध करुन देण्यास तयार असल्याने पंचायत समिती मालेगांव यांनी दिनांक २८.१.२०१३ रोजी स्व.रामराव झनक सभागृहामागील जागा उपलब्ध करुन देण्याबाबत ठराव मंजूर केला आहे. सदर ठरावास जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण खास (अर्थसंकल्पीय) सभा दि. १९.३.२०१३ रोजी सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे.

सदर जागेबाबतच्या मालकी हक्काबाबत तसेच मालेगांव विकास आराखडा मधील आरक्षण व इतर आवश्यक बाबीची तपासणी करुन जागेचा अहवाल सादर करणेबाबत पंचायत समिती मालेगांव यांना जिल्हा परिषदेने कळविले आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर शासन नियमानुसार कार्यवाही करण्याबाबत येईल.

---

**वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण रूग्णालय, मालेगाव येथे वेद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी यांच्यासह अनेक कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(३) ४२७८ (२३-१२-२०१४). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्ह्यातील ग्रामीण रूग्णालय, मालेगाव येथे वैद्यकिय अधिक्षक, वैद्यकिय अधिकारी वर्ग-२ यांचेसह अनेक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैद्यकिय अधिकारी व कर्मचाऱ्यांची असलेल्या रिक्त पदामुळे रूग्णांच्या सेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (१६-०३-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.

(२) उपलब्ध वैद्यकीय अधिकारी व इतर कर्मचा-यांमार्फत रुग्णांना आरोग्य सेवा पुरविण्यात येत असल्यामुळे रुग्ण सेवेवर परिणाम झालेला नाही.

(३) वैद्यकीय अधिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे. तसेच वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे भरण्याबाबतची कार्यवाही उपसंचालक आरोग्य सेवा, अकोला मंडळ, अकोला यांच्या स्तरावर सुरु आहे.

---

**अमरावती जिल्ह्यातील पर्यायी निधी व मंजूर कामांची पूर्तता करण्याबाबत**

**(४) ४३०५ (२२-१२-२०१४). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ग्रामविकास योजनेअंतर्गत सन २०१४-१५ मध्ये २५:१५ ची विशेष निधीतून मंजूर करण्यात आली कामे मा.मुख्यमंत्री महोदयांनी रद्द करण्याचे आदेश जिल्हापरिषद प्रशासनाला दिले असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अमरावती जिल्ह्यातील ५८ गावातील कामांना या आदेशामुळे स्थगिती आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची कामे रद्द केल्याने ही मंजूर कामे न झाल्यास ग्रामीण भागातील मुलभूत सुविधा रोड, नाली, वॉल कंपाऊंड इत्यादी कामांना विलंब झाल्यास, याला पर्यायी निधी व मंजूर कामांची पूर्तता करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०१-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. यापूर्वी स्थगित करण्यात आलेली अमरावती जिल्ह्यातील ५६ कामे शासन निर्णय क्र. विकास २०१४/प्र.क्र.१४८/यो.६. दि. २०.०३.२०१५ अन्वये रद्द झालेली आहेत.

(३) रद्द केलेल्या कामांचा अखर्चित निधी शासनाकडून परत घेण्यात आलेला नाही. त्याऐवजी शासन निर्णय क्र. विकास २०१४/प्र.क्र.५०/यो.६.दि.३०.०३.२०१५ अन्वये नवीन १७ कामांना मंजूरी देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कृषी विभागामार्फत कोरेगाव तालुक्याकरिता (जि.सातारा) टंचाई अंतर्गत सिमेंट साखळी बंधारे बांधण्याबाबत**

**(५) ४४२४ (२२-१२-२०१४). श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासन कृषी विभागामार्फत सातारा जिल्ह्यामध्ये कोरेगाव तालुक्याकरिता टंचाई अंतर्गत सिमेंट साखळी बंधारे बांधण्यासाठी ४.११ कोटी इतका सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षामध्ये मंजूर होवून प्राप्त झाला होता, हे खरे आहे काय,
(२) सदरचा निधी माहे मार्च, २०१४ अखेर खर्च करणे गरजेचे असतांना, पुर्णपणे खर्च करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व निधी पूर्णपणे वेळेत खर्च न करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०५-२०१५) :** (१) होय.
(२) व (३) होय.
तथापि रु.४.११ कोटी निधीमधुन एकुण ३६ कामाचे नियोजन असुन सदर कामे बी.-१ निविदा पध्दतीने करण्यात येत आहे. लोकसभा व निवडणुक आचारसंहीता तसेच माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये झालेला पाऊस व शेतीतील रब्बी पिके असल्याने ३६ कामापैकी २३ कामे पुर्ण झाली असुन १३ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत गाडगेबाबा निर्वाणभुमि बलगावं व श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (जि.अमरावती) विकास आराखड्याकरीता उघण्यात आलेले स्वीय प्रजंजी खात्यास मुदतवाढ मिळण्याबाबत**

**(६) ४४३० (२२-१२-२०१४). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **नियोजन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा निर्वाणभुमि बलगावं (ता.जि.अमरावती) व श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) या दोन्ही विकास आराखड्याकरीता उघडण्यात आलेले स्वीय प्रपंजी खात्यास

शासनाकडून मुदतवाढ मिळालेली नसल्यामुळे दोन्ही खात्यातील जमा असलेल्या निधींचा उपयोग विकास आराखड्यातील कामांची पुर्तता करण्यासाठी होऊ शकला नाही असे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वीय प्रपंजी खात्यास मुदतवाढ मिळण्याकरिता संबंधित विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास प्रपंजी खात्यास मुदतवाढ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०१५) :** (१) होय.
(२) नाही.

नियोजन विभागाच्या दिनांक ९.०२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये संत गाडगेबाबा निर्वाणभुमी वलगांव (ता.जि.अमरवती) व श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (ता.तिवसा, जि.अमरावती) या विकास आराखड्यासाठीच्या स्विय प्रपंजी खात्यास अखर्चीत निधी खर्च करण्याच्या परवानगीसह दिनांक ३१.०३.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील लघू, मध्यम व मोठे सिंचन प्रकल्प बंद अवस्थेत असल्याबाबत**

**(७) ४५४५ (२३-१२-२०१४). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंचनाचा अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील लघू, मध्यम व मोठे मंजूर पाटबंधारे प्रकल्पांची कामे जवळ - जवळ बंद आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अमरावती जिल्ह्याची सिंचनाचा भौतीक अनुशेष केव्हा भरुन काढण्यात येईल,
(३) असल्यास, या प्रकल्पाचे कामांकरीता एकूण किती हेक्टर जमीन संपादीत करण्यात आली आहे व आणखी किती हेक्टर जमीन संपादित करावयाची आहे याबाबतचे नियोजन तयार करण्यात आले आहे काय,
(४) असल्यास, या प्रकल्पाकरीता लागणा-या जमीनीची सरळ खरेदी पध्दती बंद करण्यात आली आहे, हे ही खरे काय आहे,
(५) असल्यास, काल मर्यादा राखुन प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन कशाप्रकारे करण्यात आलेले आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२०-०२-२०१५) :** (१) होय, अमरावती जिल्ह्यातील २ मोठे, ८ मध्यम व ३३ लघु असे एकूण ४३ प्रकल्प बांधकामाधीन आहेत. तथापि भूसंपादन, पूनर्वसन, सुप्रमा, वन मान्यता इत्यादी अडचणीस्तव अपेक्षित प्रगती साध्य झालेली नाही.

(२) अमरावती जिल्ह्यातील सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करण्यासाठी चार वर्षाचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. त्यानुसार सदर अनुशेषाचे जून, २०१६ अखेर निर्मुलन होणे अपेक्षित आहे.
(३) या प्रकल्पांचे कामाकरीता एकूण २१९८४ हे. जमीन संपादीत करण्यात आली असून आणखी ६८७३ हे. जमीन संपादीत करावयाची आहे. त्याबाबतचे नियोजन तयार करण्यात आले आहे. नियोजनानुसार अनुशेषाअंतर्गत प्रकल्पाचे भूसंपादन जून- २०१५ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(४) होय.
(५) जून, २०१५ अखेर भूसंपादन, पुनर्वसन इत्यादी अडचणी दूर करुन तसेच आवश्यक निधी अग्रक्रमाने उपलब्ध करुन देवून प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

---

**औरंगाबाद कार्यालयाने स्थानिक स्तर (जलसंधारण) सिंचन कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत**

**(८) ४६०१ (२२-१२-२०१४). श्री.हर्षवर्धन जाधव (कन्नड) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद कार्यालयाने स्थानिक स्तर (जलसंधारण) सिंचन विभागात गत ५ वर्षाच्या कालावधीत कन्नड विधानसभा मतदार संघात किती व कोणकोणती कामे पूर्ण केली आहेत,
(२) असल्यास, वरीलपैकी कोणकोणती कामे निकृष्ट दर्जाची असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या आहेत,
(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित अधिकारी व ठेकेदारावर काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) अद्यापी चौकशी प्रलंबित असल्यास त्यांची कारणे काय आहेत व ही चौकशी केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०२-२०१५) :** (१) गत ५ वर्षात कन्नड तालुक्यात खाली दर्शविल्याप्रमाणे एकूण १० कामे पूर्ण केली आहेत.

१) भिलदरी पाझर तलाव क्र.७
२) गणेशपुर पाझर तलाव क्र.५
३) कोळंबी पाझर तलाव क्र.२
४) अंधानेर पाझर तलाव क्र.२
५) नागद कोल्हापूर पध्दतीचा बंधारा (दुरुस्ती)
६) सातकुंड पाझर तलाव
७) बिबखेडा पाझर तलाव (दुरुस्ती)
८) अंधानेर पाझर तलाव क्र.१
९) जैतखेडा तांडा खोरा पाझर तलाव क्र.१
१०) अंधानेर पाझर तलाव क्र.३

(२) वरीलपैकी सर्व कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याची तक्रार असल्याची तक्रार अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद यांचेकडे प्राप्त झाली आहे.
(३) सदर कामे निकृष्ट दर्जाची झाल्याचे आढळून आलेले नाही. सबब संबंधीत अधिकारी व ठेकेदार यांचेवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ग्राम डांगोरलीमध्ये (ता.जि.गोंदिया) बाघ नदीवर बंधारे बांधण्याबाबत**

**(९) ४७२४ (२३-१२-२०१४). श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्राम डांगोरलीमध्ये (ता.जि.गोंदिया) बाघ नदीवर बंधारा बांधण्याचे प्रस्ताव आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बंधारा बांधण्यासाठी किती निधी अपेक्षित आहे तसेच किती कृषी क्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे,
(३) सदर कामाबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) अंशतः खरे आहे.
ग्राम डांगरोली (ता.जि.गोंदिया) गावांजवळ बाघ नदीवर बंधारा (बॅरेज) प्रस्तावित नसून वैनगंगा नदीवर बंधारा (बॅरेज) बांधणे प्रस्तावित आहे.
(२) प्राथमिक अंदाजानुसार या बंधारा योजनेची किंमत सुमारे रु. २५० कोटी आहे.
या योजनेस स्वतंत्र लाभक्षेत्र नाही. तथापि बॅरेजद्वारे निर्माण होणा-या साठ्यामुळे डांगुर्ली उपसा सिंचन योजना (पुर्ण झालेली), तेढवा शिवनी उपसा सिंचन योजना (बांधकामाधीन), रजेगांव काटी उपसा सिंचन योजना (बांधकामाधीन), देवरी नवेगांव उपसा सिंचन योजना (प्रशासकीय मान्यता प्राप्त) योजनांसाठी शाश्वत पाणी स्त्रोत निर्माण होणार आहे. या योजनाद्वारे ८९०१ हेक्टर सिंचन क्षेत्रास लाभ प्रस्तावित आहे.
(३) सदर प्रकल्प महाराष्ट्र मध्यप्रदेश यांच्यातील आंतरराज्य प्रकल्प असल्याने मध्यप्रदेश शासनाची सहमती मिळवणे तसेच प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भंडारा-गोसेखुर्द धरणग्रस्तांची होत असलेली गैरसोय**

**(१०) ४७८८ (२३-१२-२०१४). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा-गोसेखुर्द प्रकल्पाकरीता संपादित करण्यात आलेल्या जमीनीचा मोबदला एक पिढी होऊन गेली तरी अद्याप पर्यंत देण्यात आला नसल्याने धरणग्रस्तांना न्याय मिळाला नाही

तसेच गोसेखुर्द धरणाच्या शेजारी व वैनगंगा नदीच्या किनाऱ्यावर असलेले पाथरी गाव पाण्याखाली आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२३-०२-२०१५) :** (१) नाही.
प्रकल्पाचे धरण, बुडीत क्षेत्र, कालवे इ. साठी संपादीत जमीन २२६४४.२१ हेक्टर करिता रु. ७५६.६६ कोटी मोबदला देण्यात आलेला आहे.
बाधित गाव पाथरी सद्यःस्थितीत नविन गावठाणात पुर्णतः स्थलांतरित करण्यांत आले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भंडारा जिल्हयात महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून चालविण्यात येत असलेल्या अंगणवाडीतील ४९९ बालके तीव्र कमी वजनाच्या श्रेणीत असल्याबाबत**

**(११) ४८०४ (२२-१२-२०१४). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्हयात महिला व बालविकास प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून चालविण्यात येत असलेल्या अंगणवाडीतील ४९९ बालके तीव्र कमी वजनाच्या श्रेणीत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०३-०२-२०१५) :**(१) हे खरे आहे.
(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाच्या लाभार्थ्यांना घरपोच आहार (THR) देण्यात येतो. त्यामुळे कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत होते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठवाडयात नदयाजोड प्रकल्पाच्या कामाना निधी मिळण्याबाबत**

**(१२) ४८२१ (१५-०१-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठवाडयात सातत्याने दुष्काळ सदृश परिस्थिती उद्‌भवत असल्याने राज्य शासनाने नदयाजोड प्रकल्पाचे काम हाती घेतले असून त्याला केंद्र शासनाने माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या योजनेवर किती खर्च अपेक्षित आहे व त्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे,
(३) असल्यास कामाची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (०७-०३-२०१५) :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उमरखेड तालुक्यातील अमडापूर लघुसिंचन प्रकल्पात मुबलक जलसाठा असूनही सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नसल्याबाबत**

**(१३) ५२४७ (०९-०४-२०१५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरखेड तालुक्यातील अमडापूर लघुसिंचन प्रकल्पात मुबलक जलसाठा असूनही सिंचन सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकल्पाच्या कालव्यांच्या कामात आणि देखभालीत काय अडचणी आहेत,
(३) राज्यात टंचाईची परिस्थिती असताना या प्रकल्पातील पाण्याचा वापर न करण्यामागील कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.
या प्रकल्पाची सिंचन क्षमता १७३७ हे इतकी असून सन २०१३-१४ मध्ये १५२ हे प्रत्यक्ष सिंचन झाले आहे.
(२) व (३) अमडापुर प्रकल्पाच्या मुख्य कालव्याची एकुण लांबी १४.७४ कि.मी. आहे. मुख्य कालवा कि.मी.३ आणि ४ ची काही किरकोळ कामे कास्तकारांचे विरोधामुळे तथा जमीन उपलब्ध नसल्यामुळे होऊ शकली नाहीत. यामुळे कि.मी. ४ चे पुढे पाणी जाऊ शकत नाही. तसेच अमडापूर प्रकल्पाचे कालव्या वरिल लघुपाट क्र. ८,९,१० चे जमिनी संपादना मधे कास्तकारांचा विरोध आहे. भू-संपादन प्रस्ताव भू अर्जन अधिकारीकडे सादर आहेत. कामातील अडचणी सोडवून कालव्याची कामे जून २०१६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

---

**विदर्भातील सिंचन प्रकल्पांची सुधारित प्रशासकीय मान्यता प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ५४७० (०६-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.गणपत गायकवाड (कल्याण**

**पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भातील १९७ सिंचन प्रकल्पांना शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यताना विलंब लागत असल्याने विदर्भ सिंचन महामंडळाकडे तब्बल दोन हजार कोटी रुपये निधी पडून असल्याची माहिती दिनांक १३ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास निर्दशनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विदर्भातील १९७ सिंचन प्रकल्पांना शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यासाठी विलंब लावण्यात येत आहे, हे ही खरे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे काय वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, विदर्भातील १९७ सिंचन प्रकल्पांना शासनाकडून सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे काय वा देण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०७-२०१५) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.
जानेवारी २०१५ मध्ये विदर्भातील ७३ प्रकल्पांच्या सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहे.
(२) नाही.
१३ जानेवारी २०१५ नंतर विदर्भातील २० प्रकल्पांना सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली असुन उर्वरित प्रस्तावावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) नाही. १३ जानेवारी २०१५ नंतर विदर्भातील २० प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली असुन उर्वरित प्रस्तावावर कार्यवाही प्रगतीत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### धुळे जिल्ह्यातील चौगांव शिवारातील कॅन्टोमेंट क्रमांक २५१ या जंगताल हिंगणे येथे दोघा जणांवर बिबटयाने हल्ला केल्याबाबत

**(१५) ५८३४ (०७-०४-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगणे (जि.धुळे) येथील धुळे जिल्ह्यातील चौगांव शिवारातील कॅन्टोमेंट क्रमांक २५१ या जंगताल दोघा जणांवर बिबटयाने हल्ला केला असून चौगांव - अजनाडे जंगलात बिबट्याना वास्तव्यास योग्य जागा नसल्याने ते गावशिवारात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येथील दुर्मिळ वन्यजीवांस योग्य वास्तव्याच्या ठिकाणी हलवून येथील रहिवाशांचे दैनदिन जीवन सुरक्षित करण्याच्या दृष्टीने शासनाच्या संबंधित विभागाने काय उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,
(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) दिनांक १३.०१.२०१५ रोजी हिंगणे येथील कक्ष क्र २५१ येथे बिबट्याने दोन व्यक्तींवर हल्ला करुन जखमी केले हे खरे आहे.

हिंगणे गावाचे परिसरात १४७० हे राखीव वनक्षेत्र असल्याने बिबट्यास नैसर्गिक अधिवास देखील उपलब्ध आहे.

(२) व (३) चौगाव-हिंगणे या गावाच्या परिसरात वन अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत गावक-यांचे नियमीत प्रबोधन करण्यात येत आहे.

हिंगणे गावालगतचे वनक्षेत्रात ३ मातीचे बंधारे व २५ हेक्टर क्षेत्रावर ओघळ नियंत्रणाची कामे घेण्यात आली आहेत. चौगांव गावालगतचे वनक्षेत्रात १० हेक्टर सलग समतल चर व २५ हेक्टर क्षेत्रावर निकृष्ठ वनांचे पुनर्वनीकरण योजनेअंतर्गत मिश्र रोपवनाचे काम घेण्यात आले आहे. शिवाय मागील वर्षात ६ नैसर्गिक पाणवठ्यांचे मजबूतीकरण करण्यात आले असून आणखी ४ नैसर्गिक पाणवठ्यांचे मजबूतीकरणाची कामे प्रगतीपथावर आहेत. अशा प्रकारे वनक्षेत्रात वन्यजीव अधिवास विकासाची कामे हाती घेण्यात येत आहेत जेणेकरुन वन्यप्राण्यांना वनातच खाद्य व पाणी उपलब्ध व्हावे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोयरे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील भोगावती नदीवरील**
**कोल्हापूरी पद्धतीच्या बंधा-यांची दुरवस्था**

**(१६) ६०६७ (०६-०४-२०१५). श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोयरे (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील भोगावती नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधा-यांची दुरवस्था झाली असून तेथे अपघातांचे प्रमाण वाढले आहे, हे खरे आहे काय,
(२) सदर संबंधित विभागाच्या अधिका-यांनी कोल्हापूरी बंधा-यांची पाहणी करुन गेले परंतु अद्यापही बंधा-यांच्या दुरुस्तीबाबत कोणतीही उपाययोजना सुचविलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन या कोल्हापूरी पध्दतीच्या बंधा-यांची पाहणी करुन ती त्वरीत दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (३०-०७-२०१५) :** (१) खरे नाही.

सदर बंधारा हा वाहतुकीसाठी नाही. सदर बंधाऱ्यांची दुरुस्ती करणे आवश्यक असुन अद्यापपर्यंत अपघात झालेला नाहीत.

(२) हे खरे नाही.
(३) सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा प्रस्ताव दुरुस्ती, नुतनीकरण व पुनर्स्थापना (RRR) या कार्यक्रमांतर्गत मंजुरीस्तव केंद्रशासन पाठविण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मंजुरी मिळताच दुरुस्तीची कार्यवाही करणेत येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम तुळशी व भामणी परिसरातील जंगलात वृक्षांची बकायदेशीरपणे तोड केल्याबाबत**

**(१७) ६३९३ (०६-०४-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम तुळशी व भामणी परिसरातील जंगलात वृक्षांची बेकायदा तोड वनविभागाच्या अप्रत्यक्ष कृपाशिर्वादाने होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले तद्‌नुसार शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील पश्चिम तुळशी व भामणी परिसरातील जंगलात वृक्षांची बेकायदा तोड वनविभागाच्या अप्रत्यक्ष कृपार्शिवादाने होत असल्याची बाब खरी नाही. तथापि, स्थानिक लोकांनी त्यांच्या प्रापंचिक गरजेसाठी वृक्षतोड केल्याचे निदर्शनास आले आहे. सदरहू वृक्षतोडीबाबत भारतीय वन अधिनियम, १९२७ चे कलम २६ (१) अन्वये वनरक्षक यांनी वनगुन्हा नोंदविला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेतून वगळण्यात आलेल्या २७ गावातील गावकऱ्यांच्या मागण्याबाबत**

**(१८) ६७७७ (०८-०४-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेतून वगळण्यात आलेलया २७ गावांनी आपल्या मागण्या मान्य न झाल्याच्या निषेधार्थ दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास ठाणे जिल्हा परिषद निवडणूकीवर बहिष्कार टाकण्याच्या निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, गावकऱ्यांच्या मागण्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे, तसेच सदर मागण्या गेली ८ वर्षे प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,
(४) सदर मागण्याची पुर्तता करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :** (१) होय,
कल्याण-डोंबिवली महानगरपालिके मधून वगळलेल्या काही गावांचा नगरपंचायत व नगर पालिका करण्याचा निर्णय लवकरात लवकर घेण्याबाबत तसेच या निर्णयामुळे संपूर्ण गट व गण यांची रचना व आरक्षणात बदल होणार असल्याने संपूर्ण कल्याण तालुक्यातून गट व गणातून निवडणूक व लढण्याचा निर्णय सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने घेतला असल्याचे निवेदन सदर समितीने निवडणूक निर्णय अधिकारी यांना दि.१२.१.२०१५ रोजी दिले होते.
(२), (३) व (४) कल्याण - डोंबिवली महानगर पालिकेच्या हद्दीतुन वगळण्यात आलेली २७ गावे, नगरवकिास विभागाच्या दि.१४.५.२०१५ च्या शासन अधिसुचनेनुसार दि.१.६.२०१५ पासुन कल्याण-डोंबिवली महानगर पालिकेत समाविष्ट केलेली आहेत.

---

**कोकणातील समुद्रालगत व खाडीकिनारी असलेल्या शेतजमिनीच्या सातबारा उता-यातील नोदींबाबत**

**(१९) ७६५० (०४-०४-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोकणातील समुद्र तसेच खाडी-किनारी असलेल्या शेतजमीनीच्या ७/१२ उता-यातील इतर हक्कात खारभूमी पुर्नप्रापित लाभक्षेत्र अशी नोंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता, हे खरे आहे काय,
(२)असल्यास या निर्णयानुसार या जमिनीचे सन २००३ मध्ये सर्वेक्षण करण्यात आले हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या जमिनीचे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले आहे काय,
(४) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२९-०७-२०१५) :** (१) खारभूमी विकास अधिनियम १९७९ मधील कलम १२ (१) मधील तरतुदीनुसार खारभूमी योजना अंमलात आल्यानंतर या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या जमिनी खार जमीन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत, अशा आशयाची नोंद अशा जमिनींशी संबंधित असलेल्या अधिकार अभिलेखामध्ये करणेविषयी सूचीत केले आहे.

(२) नाही, तथापि, खारभूमी विकास अधिनियम १९७९ मधील कलम १२ (१) नुसार खारभूमी योजना पूर्ण झाल्यानंतर पुर्नप्रापित क्षेत्राचा तपशिल राजपत्रात प्रसिध्द केल्यानंतर ७/१२ उताऱ्यातील इतर हक्कात खार जमीन योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत अशा आशयाची नोंद घेण्याविषयी महसूल विभागाला कळविण्यात येते.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) पूर्ण झालेल्या खारभूमी योजनांच्या बाबतीत ७/१२ मधील इतर हक्कामध्ये नोंद घेण्याबाबत महसूल विभागास कळविण्यात येते.

---

**मुंबई - गोवा महामार्गाला जोडणा-या कासार्डे-आनंदनगर-बंडवाडी-तर्फेवाडी-तांबळवाडी-आमरेवाडी या रस्थांच्या कामाला स्थगिती मिळण्याबाबत**

**(२०) ८०२३ (०९-०४-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गाला जोडणाऱ्या कासार्डे-आनंदनगर-बंडवाडी-तर्फेवाडी-तांबळवाडी-आमरेवाडी या नवीन रस्त्यांचे पंतप्रधान ग्रामसडक योजनेतंर्गत काम सुरु, आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रस्त्यासाठी ज्या जमीन मालकांची जमिनी गेल्या आहेत त्यांची परवानगी न घेताच रस्त्याचे काम सुरु करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याच्या कामाला तात्काळ स्थगिती मिळावी, अशी मागणी जमीन मालक यांनी कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी निवेदनाद्‌वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(५) असल्यास, तद्‌नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२६-०५-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ग्रामपंचायत कासार्डे, ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग यांच्या परवानगीने सदर रस्त्याच्या दर्जोन्नतीचे काम सुरु करण्यात आले.
(३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) सदर रस्त्याच्या लांबीतील तक्रारदार जमिन मालकाच्या सर्व्हे क्र.२५ व २६ मधील साधारणपणे ३०० मी लांबी वगळून काम करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुण्यातील जेजुरी खंडोबा देवस्थानाजवळील पुणे वन विभागातर्फे पर्यटन योजनेंतर्गत उपक्रम राबविण्याबाबत

**(२१) ८११३ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील महाराष्ट्राचे आराध्य दैवत आणि लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या जेजुरी खंडोबा देवस्थानाजवळील डोंगरी सुजलाम सुफलाम करण्यासाठी पुणे वन विभागातर्फे पर्यटन योजनेंतर्गत उपक्रम राबविण्याच्या निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर उपक्रमाचे स्वरुप काय आहे व हे काम किती कालावधीत पुर्ण करण्यात येणार आहे,

(३) अद्याप निर्णयाच्या अनुषंगाने अंमलबजावणीस सुरुवात झाली नसल्यास सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२६-०५-२०१५) :** (१) होय हे खरे आहे.

(२) पुणे वनवृत्तातील भोर उपवन विभागातील जेजूरीचा खंडोबा गड आणि कडे पठार गड आदींचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास करण्यासाठी भोर उपवन विभागाने सन २०१३-१४ ते सन २०१८-१९ या कालावधीचा विकास आराखडा पुणे जिल्हा नियोजन समिती, पुणे यांच्याकडे सादर केला आहे. त्यानुषंगाने जिल्हा नियोजन समितीने सन २०१३-१४ करीता रु. ८५.०० लक्ष निधी उपलब्ध करुन दिला आहे तसेच वन क्षेत्रातील पर्यटन विकास कार्यक्रम या योजनेंतर्गत राज्य शासनाने सन २०१४-१५ करीता रु. ७५.६६ लक्ष इतका निधी मंजूर केला आहे. सदरचा उपक्रम उपलब्ध निधीनुसार सन २०१३-१४ ते २०१८-१९ या कालावधीत पूर्ण करण्यात येणार आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातून नैसर्गिक अधिवासासाठी येणाऱ्या पक्षांच्या संवर्धनासाठी व संख्या वाढविण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(२२) ८३९१ (०४-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातून नैसर्गिक अधिवासाच्या संवर्धानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण जगातील अतिक्रमिक माळढोक पक्षी नष्ट होण्याच्या मार्गावर असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने माळढोक पक्ष्यांबाबत सर्वेक्षण केले आहे काय,

(३) असलयास, राज्यामध्ये किती माळढोक पक्षी उरले आहेत,

(४) असल्यास, राज्य शासनाकडून पक्षांचे संवर्धनासाठी व त्यांची संख्या वाढवण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) सन २०१३-१४ मध्ये राज्यात माळढोक पक्षी प्रगणनेत माळढोक व नवीन माळढोक अभयारण्य परिसरात ३ व चंद्रपूर जिल्हयात ११ असे एकूण १४ माळढोक पक्षी आढळून आले आहेत.
(४) व (५) माळढोक पक्षी नामशेष होऊ नये म्हणून सन २०१४ मध्ये माळढोक संवर्धन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. माळढोक पक्षाचे अधिवासाचे संरक्षण व संवर्धन करणे, माळढोकच्या संवर्धनाकरीता जनजागृती करुन स्थानिक लोकांचे व अशासकीय संस्थाचे सहकार्य मिळवणे ही सदर माळढोक संवर्धन कृती आराखडयाची मुख उद्दीष्टे आहेत.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने जाहीर केलेल्या व्याघ्र गणनेत पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणात वाघांची संख्या कमी झाल्याबाबत**

**(२३) ८५२४ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने जाहीर केलेल्या व्याघ्र गणनेत पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातून वाघांचे अस्तित्व आढळून आले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्नाटक, उत्तराखंड, तामिळनाडू व अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रातील वाघांच्या वाढीचा वेग मंदावला असून वाघांची संख्या झपाटयाने कमी होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर वाघांची संख्या कमी होण्याची कारणे कोणती व वाघांच्या संरक्षणासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) कर्नाटक, उत्तराखंड, तमिळनाडू इत्यादी राज्याचे तुलनेत महाराष्ट्र राज्यात वाघांच्या संख्येत वाढ होण्याचा वेग कमी असला तरी इतर बऱ्याच राज्यांच्या तुलनेत हा वेग जास्त आहे.

सन २०१० मध्ये झालेल्या व्याघ्र प्रगणनेपेक्षा सन २०१५ मध्ये झालेल्या प्रगणनेत वाघांची संख्या १२.५ टक्क्याने वाढल्याचे निदर्शनास आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्याच्या १४ वनवृत्तांतील १० हजार वनगुन्हे कायम स्वरुपी कायदेतज्ञ नसल्याने प्रलंबित असल्याबाबत**

**(२४) ८५७४ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या १४ वनवृत्तांतील १० हजार वनगुन्हे कायम स्वरुपी कायदेतज्ञ नसल्याने प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात केवळ ११ कायदेतज्ञावर वनगुन्हयाचा भार असल्याने प्रलंबित प्रकरणांचा निपटारा होत नसल्याने शिक्षेचे प्रमाण कमी आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बाब १ व २ नुसार चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने स्वतंत्र विधी सल्लागार प्रशिक्षण केंद्र आणि कायमस्वरुपी सल्लागाराच्या नियुक्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, कार्यवाहीस होणा-या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१) हे खरे नाही. न्यायालयात सुमारे ४७०० प्रकरणे प्रलंबित असून ती कायदेतज्ञ नसल्याने प्रलंबित आहेत, ही वस्तुस्थिती नाही.

(२) शासन निर्णय दि. १३.११.२०१३ अन्वये राज्यातील वनविभागातर्फे न्यायालयात योग्य व प्रभावीपणे बाजू मांडण्यासाठी ११ विधी सल्लागारांची मानधनावर नियुक्ती करण्यात आली आहे. प्रलंबित प्रकरणाचा निपटारा होत नसल्याने शिक्षेचे प्रमाण कमी होत असल्याची बाब निदर्शनास आली नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंगणवाडीतील मुले, किशोरवयीन मुली आणि स्तनदा माता यांना घरपोच आहाराच्या (टीएचआर) आलेल्या तक्रारीबाबत**

**(२५) ८५९२ (०७-०४-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंगणवाडीतील मुले, किशोरवयीन मुली आणि स्तनदा माता यांना घरपोच आहार (टीएचआर) शासनामार्फत देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ३ वर्षासाठी सुरु केलेली योजना ५ वर्षाचा काळ लोटला तरी सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टीएचआरबाबत तक्रारी आल्याने तत्कालीन मा. राज्यपाल महोदयांनी चौकशीचे आदेश देण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाब १,२ व ३ बाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) केंद्र शासनाच्या दि.२४/०२/२००९ च्या पत्रान्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि मा. सर्वोच्च न्यायालयाचे दि. २२/०४/२००९ च्या आदेशानुसार एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता तसेच ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार (THR) पुरविण्याच्या सूचना दि.२४/०८/२००९ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत.

त्यानुषंगाने सन २००९ मध्ये घरपोच आहार (THR) महिला बचत गट / महिला मंडळे / ग्राम समुदाय यांचेकडून पुरवठा करण्यासाठी आयुक्तालयामार्फत अर्ज मागविले होते. सदर THR पुरवठयाचा कालावधी माहे जून, २०१३ मध्ये संपुष्टात येणार असल्यामुळे आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी त्यांच्या दि. २४/०५/२०१३ च्या पत्रान्वये THR (Take Home Ration) पुरविणेबाबत जिल्हास्तरीतय आहार समितीमार्फत स्थानिक महिला बचतगट/ महिला मंडळ/ ग्राम सुमदाय यांनी निवड प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत सूचित केले. मध्यंतरीच्या काळात THR चा पुरवठा अखंडीतपणे सुरु ठेवण्यासाठी पात्र व सक्षम महिला बचत गट तयार होईपर्यंत सध्याच्या महिला संस्थाकडून लाभार्थ्यांना THR चा पुरवठा सुरु ठेवण्यास दि. १२/०७/२०१३ च्या शासन पत्रान्वये मान्यता दिलेली आहे. तसेच याबाबत कोणतीही अंतिम मुदत (Any time deadline) न ठेवता THR चा पुरवठा करण्यासाठी महिला बचत गटांची प्रकल्प स्तरावर अंतिम निवड झाल्याबरोबर सध्याच्या ०३ पुरवठादार महिला संस्थामार्फत सुरु असलेला THR चा पुरवठा बंद करुन स्थानिक बचत गटांकडे शक्य तितक्या तातडीने हस्तांतर करणेबाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबाच्या प्रवेशद्वारावर नियमाची नियमावली दर्शविणारे फलक लावण्याबाबत

**(२६) ८६६४ (०७-०४-२०१५). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१)चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा बफर झोनमध्ये येणारे पर्यटक या परिसरात प्लास्टिक पिशव्या, स्टेपलर बिना लावलेले खाद्यपदार्थाचे कागदी खोके आणि पाण्याच्या रिकाम्या बाटल्या, काचेच्या बाटल्यामुळे बफर झोनमधील तृणभक्षी वन्य जीवांना धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या जंगलाच्या प्रवेशद्वारावर जंगलात सक्तीने पाळावयाच्या नियमाची नियमावली दर्शविणारे फलक नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गोष्टींना निर्बंध घालण्याकरिता शासनामार्फत आता कोणती उपाययोजना केली जाणार आहे वा करण्यात येणार आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१४-०५-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
बफर विभागात पाच निसर्ग पर्यटन मार्गावर नियमावली असणारे फलक लावण्यात आलेले आहेत, तसेच पर्यटकांसोबत असणा-या मार्गदर्शकांना ह्या संबंधात प्रशिक्षण देण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून असे प्रकार घडू नये ह्याची दक्षता घेतली जाते.

---

**राज्यात वाघांच्या रक्षणासाठी गस्त घालणा-या**
**वनपाल व वनरक्षकांकडे शस्त्रे नसल्याबाबत**

**(२७) ८७२७ (०७-०४-२०१५). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाघांच्या रक्षणासाठी गस्त घालणा-या वनपाल व वनरक्षकांकडे शस्त्रे नसल्याने ते शिकाऱ्यांशी लढा देऊ शकत नसल्याबाबतचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षात विदर्भात व्याघ्र प्रकल्पाच्या रेड अलर्ट भागात वाघांची शिकार झाल्याची बाब वनविभागाच्या निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या वनविभागातील वनअधिका-यांकडे कर्तव्यावर जातांना कुठल्याही प्रकारची शस्त्रे नसल्याने ते शिका-यांशी लढा देऊ शकत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या वन विभागातील गस्त घालणा-या वनपाल व वनरक्षकांकडे शिका-यांशी लढा देण्याकरिता आधुनिक शस्त्रे पुरविण्यात येणार आहे काय आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (३०-०५-२०१५) :** (१), (२), (३) व (४) राज्यात वन व वन्याप्राण्यांचे संरक्षणासाठी क्षेत्रिय अधिका-यांना पिस्तोल व कर्मचा-यांना रायफल उपलब्ध अनुदानातून गरजेनुसार पुरविण्यात येत आहे.

विदर्भातील पाच व्याघ्र प्रकल्पात वन व वन्यप्राण्यांचे संरक्षणासाठी क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांना एकूण ६९ पिस्तोल, ३८ एस.एल.आर. व ५४ ऍक्शन गन/बंदुक उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. तसेच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प व पेंच व्याघ्र प्रकल्पासाठी दोन विशेष व्याघ्र संरक्षण दल (११२ अधिकारी/कर्मचारी) स्थापन करण्यात आले असून मेळघाट व नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पासाठी दोन विशेष व्याघ्र संरक्षण दल मंजूर करण्यात आली आहेत.

सन २०१३ व सन २०१४ या मागील २ वर्षात मेळघाट व्याघ्र प्रकल्पा दिनांक ०४.०३.२०१३ रोजी १ वाघ व दिनांक ०८.०६.२०१३ रोजी १ वाघ अशी वाघाच्या शिकारीची एकूण २ प्रकरणे निदर्शनास आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्हयातील नेरपिंगळाई येथील शेतक-यांना धडक सिंचन आणि मनरेगा विहीर योजनेचा वाढीव निधी मिळण्याबाबत**

**(२८) ९७२६ (०७-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील नेरपिंगळाई येथील शेतक-यांना धडक सिंचन आणि मनरेगा विहीर योजनेचा वाढीव निधी तात्काळ मिळण्यासाठी शेतकरी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना माहे जानेवारी, २०१५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतक-यांना धडक सिंचन आणि मनरेगा विहीर योजनेचा वाढीव निधी तात्काळ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२५-०८-२०१५) :** (१) होय.

(२) प्रस्तुत प्रकरणी धडक सिंचन विहीर योजनेतील इतर लाभार्थ्यांच्या अपुर्ण विहीरी पुर्ण करणेसाठी देय असलेल्या रु. १ लक्ष अनुदानात वाढ करण्यात आली असून सदर अनुदान रु. २.५० लक्ष च्या मर्यादत करण्यात आले आहे. तर अनु.जाती/जमाती, लहान व सिमांत शेतकरी लाभार्थ्यांच्या अपुर्ण विहीरी नरेगात वर्ग करण्याचा निर्णय दि. २३ जानेवारी, २०१४ रोजी घेण्यात आला आहे. त्यानुसार लाभार्थ्यांना वाढीव निधीचा लाभ देण्यात येत आहे.

तसेच या योजनेअंतर्गत अपुर्ण विहीरी पूर्ण करण्यासाठी दि. ३०/६/२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लातूर जिल्हयातील सिमेंट नाला बांध टप्पा-३ च्या कामासाठी निधी मिळण्याबाबत**

**(२९) १०९१७ (०७-०४-२०१५). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील सिमेंट नाला बांधा टप्पा-३ अंतर्गत भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या एकूण ७० सिमेंट नाला बांधा व प्रगती पथावर असलेल्या एकूण १९ सिमेंट बांधसाठी कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग लातूर यांनी दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी लेखी निवेदनाद्वारे अधिक्षक अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) मंडळ, औरंगाबाद, मुख्य अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण), पुणे यांचेकडे सन २०१४-२०१५ या आर्थिक वर्षासाठी निधी वितरीत करण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामासाठी आवश्यक असलेला निधी वितरीत करण्याबाबत शासनाकडे २३ वेळा लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, लातूर यांनी मागणी केलेली असतानाही आजमितीस सदरहू निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू निधी उपलब्ध करुन वितरीत न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(४) भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या सिमेंट नाला बांधसाठी रुपये ३४५.९५ लक्ष निधीची मागणी असून ती शासनाकडून पूर्ण झालेल्या लातूर जिल्ह्यातील लघुसिंचन (जलसंधारण) विभागाची सिमेंट नाला बांधची कामे संपूर्णत: ठप्प झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आवश्यक तो निधी विनाविलंब उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०४-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. कामे पूर्ण झालेल्या योजनांसाठी वेळोवेळी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) हे खरे नाही.
निधी उपलब्धतेसाठी कोणतेही काम थांबलेले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नान्नज (जि.सोलापूर) येथील माळढोक पक्षी अभयारण्यासाठी संपादित केलेल्या जमिनीचा जमिनधारकांना मोबदला मिळण्याबाबत**

**(३०) १०९५६ (०४-०४-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नान्नज (जि.सोलापूर) येथील माळढोक पक्षी अभयारण्यासाठी नव्याने ९६.३३ हेक्टर जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू झाली असून या संपादनानंतर माळढोकचे क्षेत्र १२९१ हेक्टर इतके होणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या संपादित जमिनीचा मोबदला संबधितांना देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२२-०६-२०१५) :** (१) व (२) चौकशी अधिकारी तथा उपविभागयी अधिकारी, सोलापूर - १ यांनली सुरवातीला ४३४.३२ हे क्षेत्र संपादीत करण्याबाबत शिफारस केली होती. त्यानंतर ऑक्टोबर २०१३ मध्ये झालेल्या फेर चौकशीत उपविभागीय अधिकारी माढा व उपविभागीय अधिकारी पंढरपूर यांच्याकडून आणखी ४६.०७ हे क्षेत्र संपादीत करण्याचे प्रस्तावित करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ४८०.२९ हेक्टर क्षेत्र संपादन करायचे आहे. सन २०१३-१३ मध्ये रु. १०.०० कोटी रुपये संपादीत जमिनीच्या मोबदल्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यानुसार उत्तर सोलापूर तालुक्यातील मौजे मार्डी, मधील ३८३.९६ हेक्टर क्षेत्र संपादनासाठी रु. ५,३५,५२,३५८/- संबंधित खातेदारांना अदा करण्यारत आले असून उर्वरीत

रु. ४,६४,४७,६४२/- पी.डी.पी.एल.ए.ठेव खात्यात जमा करण्यात आले आहेत. सन २०१४-१५ मध्ये रु. १०.५६६ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यातून रु.५,५५,४०,४७१/- संबंधीत खातेदारांना अदा करण्यात आले असून उर्वरीत रु.५,०१,१९,५२९/- पी.डी.पीएल.ए.ठेव खात्यात जमा करण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत माळढोक अभयारण्याचे क्षेत्र १२२९.२४ चौ.की.मी. असून अहमदनगर व सोलापूर जिल्हयातील राखीव वन, गायरान जमिन तसेच ४८०.२९ हेक्टर खाजगी संपादीत क्षेत्र धरुन माळढोक अभयारण्याचे एकूण ३६६.७३ चौ.कि.मी. इतके सिमित ठेवण्याबाबतचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अगंणवाऊी केंद्राना (THR) अंर्तगतचा सकस आहार पुरवठा बचत गटांना करण्याबाबतची कार्यवाही होत नसल्याबाबत**

**(३१) १०९७२ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व वाशिम जिल्हयातील कारंजा वाशिम मंगरुळपीठ येथील महिला बचत गटांनी (THR) अंर्तगत मा.उच्च न्यायालयाचे आदेशाने अंगणवाडी केंद्राना सकस आहार पुरवठा करण्याचे आदेश असल्याने वाशिम जिल्हा परिषदेने बचतगटाकडून अर्ज प्रक्रिया पूर्ण केली परंतु अद्यापही सकस आहार सुरू करण्याबाबत संबंधितानी आदेश दिले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बचत गटांनी बँकेचे कर्ज काढून आपली स्वत:ची मशिनरी (यंत्र) उपलब्ध करून आर्थिक गुंतवणुक व वीज पुरवठा प्राप्त केला असून परंतु त्यांना आहार पुरवठा करण्याचे आदेश दिलेच नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत दोषींवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१५-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) आहार पुरवठा करण्याचे आदेश दिले नाहित, हे खरे आहे.

(३) व (४), एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाडीतील ६ महिने ते ३ वर्ष वयोगटातील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तनदा माता तसेच ३ वर्षे ते ६ वर्षे वयोगटातील तीव्र कमी वजनाची बालके यांना घरपोच आहार (THR) चा पुरवठा करण्यासाठी जिल्हास्तरीय आहार समितीमार्फत स्थानिक महिला बचतगट /महिला मंडळ/ ग्राम समुदाय यांची निवड प्रक्रिया पुर्ण करण्याबाबत आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांनी त्यांच्या दि. २४/०५/२०१३ च्या पत्रान्वये सूचित कले. सध्यस्थितीत राज्यातील ५५३ प्रकल्पांपैकी ३०८ प्रकल्पांमध्ये स्थानिक महिला बचत गट /महिला मंडळ /ग्राम समुदाय यांची जिल्हास्तरीय

आहार समितीमार्फत निवड करुन त्यांचेमार्फत THR आहार पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे. उर्वरित प्रकल्पांमधील निवड प्रक्रिया सुरु आहे. दरम्यानच्या काळात मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र. ५३४४/२०१४ मे. समृध्दी महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या.नागपूर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर प्रकरणी दि.२१/११/२०१४ रोजी स्थगनादेश प्राप्त झाल्याने या प्रकरणात कोणतीही कार्यवाही करता आली नाही. सदर प्रकरणी दि.०२/०२/२०१५ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये शासनाच्या वतीने सादर केलेल्या शपथ पत्रानुसार मे.समृध्दी महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्या. नागपूर यांनी याचिका मागे घेतल्यामुळे सदर न्यायालयीन प्रकरण निकाली काढण्यात आले आहे. त्यामुळे नागपूर जिल्हयात निवड करण्यात आलेल्या महिला बचत गट/ महिला मंडळ यांना उत्पादन केंद्र सुरु करण्याची परवानगी देण्याची कार्यवाही जिल्हास्तरीय आहार समितीच्या मान्यतेने करण्यात येत आहे.

तसेच वाशिम जिल्हयात महिला बचत गटांनी उभारलेल्या उत्पादन केंद्राची तपासणी करण्याकरीता संबंधित तालुक्याचे तहसिलदार यांचे अध्यक्षतेखालील दि. १०/०२/२०१५ अन्वये समिती गठीत करण्यात आली असून सदर समितीने महिला बचत गटांनी उभारलेल्या उत्पादन केंद्राची तपासणी करण्याची कार्यवाही चालू आहे.तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर महिला बचत गटांना आहार पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येतील.

---

### गंगापूर-खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथील महिला बचत गट भवन बांधकांमाबाबत

**(३२) १०९७३ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगापूर-खुलताबाद (जि.औरंगाबाद) येथे महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या मसाला विक्रीसाठी व प्रशिक्षण बैठकीसाठी शासनाने बचत गट भवन बांधकामासाठी विशेष बाब म्हणून शासनाने निधी देण्यात यावा याबाबतच्या मागणीचे पत्र स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ५ मार्च, २०११ व दिनांक १७ डिसेंबर, २०१२ रोजी शासनास पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या प्रकरणी कोणती कार्यवाही केली व बचतगट भवन बांधकामांचे आदेश यंत्रणेला देण्यात आले आहे काय,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) होय.

(२) व (३) बचत गट भवन उभारण्यासंदर्भात या विभागाकडे कोणतीही योजना कार्यरत नसल्याने बचत गट भवन बांधकामांचे आदेश देण व त्या अनुषंगाने सदर प्रयोजनासाठी निधी उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही.

---

**परभणी शहरातील जिल्हा रूग्णालयाच्या रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा असल्याबाबत**

**(३३) १०९९७ (०७-०४-२०१५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील जिल्हा रूग्णालयाच्या रक्तपेढीत रक्ताचा तुटवडा जाणवत असून एक हजार बॅगची आवश्यकता असतांना रक्तपेढीत केवळ २० बॅग रक्त उपलब्ध असल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, २०१४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तात्काळ रक्ताची आवश्यकता असेल तर ब्लड डोनर बोलावून किंवा रिप्लेसमेंटव्दारे रक्ताची कमतरता पूर्ण केली जात आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे,

(४) तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरची तपासणी करणाऱ्या "पिसीपीएनडीटी" चे नोडेल ऑफीसर पद मागील दोन ते तीन वर्षापासून रिक्त असल्याबाबत**

**(३४) ११०२१ (०६-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील सोनोग्राफी सेंटरची तपासणी करणाऱ्या "पिसीपीएनडीटी" चे नोडेल ऑफीसर पद मागील दोन ते तीन वर्षापासून रिक्त असून माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पदभरती प्रक्रिया पूर्ण करुन हे पद भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०७-२०१५) :** (१), (२) व (३) उस्मानाबाद जिल्ह्याती सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यासाठी पीसीपीएनडीटी करिता नोडल ऑफिसरचे पद मंजुर नाही. परंतु राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सन २०१२-१३, सन २०१३-१४ व सन २०१४-१५ या वर्षाच्या पीआयपी

मध्ये पीसीपीएनडीटी करिता जिल्हास्तरावर वैद्यकिय अधिकारी हे पद मंजुर होते. सदर पदावर नियुक्ती देण्यात आलेल्या वैद्यकिय अधिकारी यांनी दि.०१/०२/२०१५ रोजीच्या अर्जान्वये वैद्यकिय अधिकारी या पदाचा राजीनामा दिला आहे. सन २०१५-१६ च्या पीआयपी अंतर्गत पीसीपीएनडीटी करिता वैद्यकिय अधिकारी या पदाचा अंतर्भाव करण्यात आलेला नाही.

---

**उस्मानाबाद जिल्ह्यातील समुद्रवाणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रची सुसज्ज इमारत उभारल्याबाबत**

**(३५) ११०२२ (०६-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा - कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री,राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील समुद्रवाणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची सुसज्ज इमारत उभारली असताना आरोग्य केंद्राचा कारभार पूर्णपणे ढेपाळला हे माहे जानेवारी, २०१५ मध्ये उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी यांनी मुख्यालयी राहण्याच्या सूचना असून देखील ते तेथे राहत नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०२-०७-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र, समुद्रवाणी, जि.उस्मानाबाद बंद पडल्याचे निदर्शनास आलेले नाही. या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी मुख्यालयी निवासस्थानात वास्तव्य करुन राहतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उस्मानाबाद जिल्हयात जलसंधारण कार्यक्रमांतर्गत साखळी सिमेंट बंधा-याच्या कामाबाबत**

**(३६) ११०२५ (०६-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यात सतत पडणारा भीषण दुष्काळ, खालावलेली भूजलपातळी कमी करण्याच्या हेतूने शासनाकडून गतवर्षी जलसंधारण कार्यक्रमांतर्गत साखळी सिमेंट बंधा-याची तब्बल १५४ कामे मंजूर करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी अद्याप किती बंधा-यांची कामे पूर्णत्वास आली आहेत व पूर्ण झालेल्या बंधा-यांची गुणवत्ता तपासली गेली आहे काय,
(३) नसल्यास, उर्वरित बंधा-यांची कामे पूर्ण करुन घेऊन गणुवत्ता तपासणी होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
उस्मानाबाद जिल्हयात गतवर्षी सन २०१३-१४ मध्ये जलसंधारण कार्यक्रमांतर्गत साखळी सिमेंट बंधाऱ्याच्या एकूण १४७ कामांना मुजूरी प्राप्त आहे.
(२) एकुण १४७ साखळी बंधाऱ्यापैकी ११२ बंधारेची कामे पुर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या सर्व बंधाऱ्यांची गुणवत्ता तपासण्यात आली आहे.
(३) उर्वरीत ३५ बंधाऱ्यापैकी २५ बंधारेची कामे प्रगतीपथावर असून त्यांची गुणवत्ता तपासणी निविदा तरतुदीनुसार करण्यात येत आहे.

---

**आदर्श गाव व प्रकल्प समितीच्या यादीमध्ये उस्मानाबाद जिल्हयातील एकही गावाचा समावेश नसल्याबाबत**

**(३७) ११०२८ (०४-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या आदर्श गाव व प्रकल्प समितीच्या यादीमध्ये मागास असलेल्या व दुष्काळाने होरपळणाऱ्या उस्मानाबाद जिल्हयातील एकही गावाचा समावेश झाला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या ५९ योजनापासून जिल्हयातील गावे वंचित राहू नयेत म्हणून शासनस्तरावर काय उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :** (१) व (२) उस्मानाबाद जिल्हयातील एकूण ५ गावांचे प्रस्ताव जिल्हास्तरीय समितीने राज्यस्तरीय समितीकडे आदर्शगाव योजनेत समाविष्ट करण्यासाठी पाठविले होते. परंतु सर्व गावांच्या छाननीअंती सदर गावे आदर्शगाव योजनेच्या निकषात बसले नाहीत. त्यामुळे उस्मानाबाद जिल्हयातील सदर गावांचा समावेश आदर्शगाव योजनेत करण्यात आला नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाडयात बांधण्यात आलेल्या कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या गहाळ झालेल्या दरवाजाबाबत**

**(३८) ११०८७ (०८-०४-२०१५). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यात शासनामार्फत बांधण्यात आलेल्या २७८६ कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या एकून १,२९,७२२ दरवाजापैकी सुमारे १९१४१ गहाळ झालेल्या दरवाजाबाबत गुन्हा नोंद होवून पुढील झालेल्या तपासाचे स्वरूप काय आहे,

(२) असल्यास, उक्त तपासानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उर्वरित गहाळ झालेल्या १५५४६ दवाजाबाबत गुन्हा नोंद करणे व खातेनिहाय चौकशी करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय, असल्यास केलेल्या कार्यवाही स्वरूप काय आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

मराठवाडा प्रदेशात लघु सिंचन (जलसंधारण) विभागामार्फत बांधण्यात आलेल्या २७८६ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यापैकी १४२१ कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे १९१४१ दरवाजे चोरीस गेलेले आहेत. १९१४१ दरवाज्यापैकी ३५९५ दरवाज्यांच्या बाबतीत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणेमार्फत चालू आहे.

(२) पोलीस यंत्रणेमार्फत तपास चालू आहे.

(३) कार्यवाही सुरु आहे.

(४) गुन्हा नोंद झालेल्या ३५९५ दरवाज्यांच्या बाबतीत पोलीस यंत्रणेमार्फत तपास चालू आहे. तसेच उर्वरित गहाळ दरवाज्यांच्या क्षेत्रिय यंत्रणेमार्फत प्राथमिक तपास व शोध चालू आहे.

---

**जळगांव जिल्हयातील पारोळा तालुक्यातील बोरीनदीवर बांधण्यात येणा-या बंधा-याच्या कामास झालेला विलंब**

**(३९) ११६४१ (०६-०४-२०१५). डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयातील पारोळा तालुक्यातील बोरीनदीवर बांधण्यात येणारा काेल्हापुरी पध्दतीच्या बंधा-याचे कामाचे नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्यात आली आहेत, ह खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामावर किती खर्च अपेक्षित आहे,

(३) या बंधाऱ्याच्या कामास केव्हा सुरुवात करण्यात येईल अंदाजपत्रके व नकाशे तयार करण्यास विलंब झाला असल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०७-२०१५) :** (१) होय.
(२) या कामास रु. ३२६.४५ लक्ष खर्च अपेक्षित आहे.
(३) या बंधाऱ्याच्या कामासाठी दिनांक ३ जुलै, २०१४ रोजी कार्यारंभ आदेश दिले असून काम प्रगतीपथावर आहे.

---

**मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करणा-या महिलांना आर्थिक विकास करण्याकरिता लघुउद्योग व कुटिर उद्योग सुरु करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(४०) ११६८५ (०६-०४-२०१५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या महिलांचा आर्थिक विकास करण्याकरिता लघुउद्योग व कुटिर उद्योग सुरु करण्याकरिता शासनस्तरावरुन योजना आखण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचे स्वरुप काय आहे त्यांची अंमलबजावणी कशाप्रकारे करण्यात येणार आहे,
(३) अद्याप कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१) फक्त मुंबईतील झोपडपट्टयांमध्ये वास्तव्य करणा-या महिलांसाठी अशी कोणतीही वेगळी योजना या विभागाकडे राबविली जात नाही व प्रस्तावितही नाही.

तथापि, महिला व बाल विकास विभागांतर्गत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ (माविस) मार्फत संपूर्ण राज्यामधील ग्रामीण व शहरी भागातील महिलांसाठी महिला सक्षमीकरणाचे कार्यक्रम राबविले जातात. तसेच माविम सध्या अल्पसंख्याक विभागाच्या मदतीने राज्यातील एकूण १३ शहरांमध्ये महिला सक्षमीकरणाचे काम करीत आहे. या कर्यक्रमातंर्गत मुंबईमध्ये ३१८ स्वयंसहाय्य बचत गटांची निर्मिती केली असून यामध्ये ५,९०९ महिलांचा समावेश आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील स्वयंसेवी संस्थांच्या बालगृहांत पोषण अनुदानाच्या दरात वाढ करण्याबाबत**

**(४१) ११७२२ (१०-०४-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य सरकारच्या मान्यतेने राज्यात स्वयंसेवी संस्थांच्या बालगृहांत पोषण अनुदानाचा दर प्रती बालक २१ रुपये वरुन ३० रुपये करण्याचा निर्णय शासनाने सन २०१२ मध्ये घेतला होता परंतु त्याची अंमलबजावणी केली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रती बालक रु.२१ चे अनुदान सुध्दा राज्यातील बालगृहांना मागील २ वर्षापासून वेळेवर दिले जात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, थकलेली उधारी न मिळाल्याने पुरवठाधारकांनी किराणा माल देणे बंद केले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, या अनाथ-निराधार बालकांचे व्यवस्थित संगोपन करण्यासाठी बालगृहांना तात्काळ अनुदान देण्यासाठी व त्यात वाढ करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२२-०६-२०१५) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.
(४) सन २०१४-१५ या आर्थिक वर्षामध्ये रु.३१,५७,३५,०००/- (अक्षरी एकतीस कोटी सत्तावन्न लक्ष पस्तीस हजार फक्त) इतकी रक्कम संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांना वितरित करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातुर जिल्हयात एकात्मिक पाणलोट विकास योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(४२) ११७६६ (०६-०४-२०१५). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातुर जिल्हयात एकात्मिक पाणलोट विकास योजने अंतर्गत घेण्यात आलेल्या कामांमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याचे माहे नोव्हेंबर, २०१४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ३ नोव्हेंबर २०१४ रोजी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात उघडण्यात आलेल्या काळ्या मातीत काम करण्याच्या निविदा प्रक्रियेतही मोठा गैरव्यवहार झाला, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयात करण्यात आले असल्यास, जिल्हयात करण्यात आलेल्या कामांची तपासणी करुन गुणवत्ता आधारावर कंत्राटदारांना देयके द्यावीत अशी नागरीकांची मागणी आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१८-०६-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही, काळया मातीत काम करण्यासाठी मागविलेल्या निविदा प्रक्रीयेत कुठलाही गैरव्यवहार झालेला नाही.
(३) हे खरे नाही, सदर कामे मार्गदर्शक सुचनानुसार करण्यात येतात व सर्व स्तरावर गुणवत्तेची तपासणी केल्यानंतर कंत्राटदारांना देयके दिली जातात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदपुर (जि.लातुर) तालुक्यातील पाणलोट विकासाची कामे बंद असल्याबाबत**

**(४३) ११७६९ (०६-०४-२०१५). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदपुर (जि.लातुर) येथिल पाणलोट क्षेत्रविकास समितीला धर्मादाय आयुक्तांकडुन परवानगी मिळालेली नसल्याने या तालुक्यातील पाणलोट विकासाची कामे ठप्प झाली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणलोट विकास समितीच्या नोंदणी शिवाय कामे करता येत नसल्याने माहे जुन २०१३ पासुन पाणलोट विकासाची कामे देण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, समिती नोंदणीत विलंब होण्याची कारणे काय आहेत,

(४) तांत्रिक बाबीसाठी शेतकरी हिताची पाणलोट विकासाची कामे न करण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२३-०६-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) मा. धर्मादाय आयुक्त, लातूर यांच्या कार्यालयाकडून नोंदणी प्रस्तावामध्ये सतत त्रुटी काढून प्रस्ताव प्रलंबित ठेवल्यामुळे समितीच्या नोंदणीत विलंब झाला आहे.

(४) संस्था नोंदणी अधिनियम १८६० अंतर्गत पाणलोट समितीच्या नोंदणी अभावी कामे करता आली नाहीत.

(५) पाणलोट समित्या गठीत आहेत, परंतु नोंदणीकृत नाहीत अशा ठिकाणी पूर्वी ग्रामसभेद्वारे गठीत परंतु नोंदणीकृत नसलेली पाणलोट समिती तशीच राहील मात्र  ग्रामसभेने आढावा घेऊन ग्रामपंचायतीशी विचारविनिमय करुन "पाणलोट समिती" ही ग्रामपंचायतीची ग्राम विकास समिती गठीत करणेबाबत ठराव करावा. अशा परिस्थितीत संस्था नोंदणी अधिनियम,१८६० अंतर्गत पाणलोट समिती नोंदणी नोंदणीकृत करणे अनिवार्य राहणार नाही, अशा सूचना दि.१९/०८/२०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत.

---

**इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी करताना प्रशासकीय स्तरावरील निष्काळजीमुळे महाराष्ट्रात ३५ कोटी रु. खर्च वाया गेले असल्याबाबत**

**(४४) ११८५३ (०६-०४-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी करताना प्रशासकीय स्तरावरील निष्काळजीमुळे महाराष्ट्रात ३५ कोटी रु. खर्च वाया गेल्याचे दिनांक २२ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासंबंधी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार शासनाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१३-०७-२०१५) :** (१) नाही.

इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करण्यात येते. सदरच्या सुचनेनुसार घरकुलाचे बांधकाम स्वत: लाभार्थ्यांने करणे अपेक्षित आहे. तसेच सामान्य परिस्थितीत २ वर्षात व विशिष्ट परिस्थितीत ३ वर्षात घरकुलाचे बांधकाम पूर्ण करावयाचे आहे.

तसेच लाभार्थ्यांना निधीचे वाटप घरकुल मंजूर केल्याबरोबर रु.३५,०००/- पहिला हप्ता, लिंटल लेव्हल पर्यंत बांधकाम झाल्यानंतर रु.३५,०००/- दुसरा हप्ता व शौचालयासह घरकुल पूर्ण झाल्यानंतर रु.२५,०००/- तिसरा व अंतिम हप्ता अदा करण्यात येतो.

डिसेंबर, २०१४ अखेर योजनेची आर्थिक व भौतिक प्रगती खालीलप्रमाणे-

(रूपये कोटीत)

| उद्दिष्ट | मंजूरी | पूर्ण | % | उपलब्ध निधी | खर्च | % |
|---|---|---|---|---|---|---|
| १७१७२२ | १६६६७१ | ३८१०८ | २२ | ८७६.८६ | ७०७.०३ | ८० |

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मौजे विलवडे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील विलवडे रेल्वे स्टेशन (पश्चिम) ते नारळ बाग (राजापूर - कोल्हापूर) रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत

**(४५) १३३७७ (०८-०४-२०१५). श्री.प्रदीप नाईक (किनवट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे विलवडे (ता.लांजा, जि.रत्नागिरी) येथील विलवडे रेल्वे स्टेशन (पश्चिम) ते नारळ बाग (राजापूर - कोल्हापूर) रोड पर्यन्त असलेल्या २ कि.मी. रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण तसेच सदरहू रस्त्यावरील दोन मो-यांची उंची वाढवून रस्ता रेल्वे प्रवाशांकरिता त्वरेने तयार करण्याबाबत तेथील ग्रामस्थ अनेक वर्षापासून शासनाकडे मागणी करीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रस्ता दळणवळणाच्या तसेच तेथील ग्रामस्थांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असून याबाबत तेथील ग्रामस्यांनी पाठपुरावा केला असता अद्यापपर्यंत कोणती ही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्याचे काम तातडीने हाती घेण्याबाबत तसेच प्रशासकीय मंजूरी व निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०८-२०१५) :** (१) जिल्हा परिषद रत्नागिरी अथवा शासनाकडे मागणी प्राप्त नाही.

(२), (३) व (४) विलवडे गुरववाडी रेल्वेस्टेशन रस्ता सन २००१-२०२१ रस्ते विकास योजनेनुसार ग्रामीण मार्ग क्र.१९० दर्जाचा असून एकूण लांबी १.५०० कि.मी. आहे. त्यापैकी ०.९०० कि.मी. खडी पृष्ठभाग व ०.१०० कि.मी. मुरमी पृष्ठभाग व ०.५०० कि.मी. अस्तित्वात नसलेली लांबी आहे. सदर रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरणाचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे. तसेच या लांबीमध्ये आवश्यक असलेल्या मोठ्या पूलाचे बांधकाम मंजूरीसाठी प्रस्तावित करण्याबाबत जिल्हा परिषदेकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, रत्नागिरी यांना कळविण्यात आले आहे.

---

**लघु पाटबंधारे विभाग भंडारा यांनी फुटाळा तलावाच्या कालव्यासाठी जमिनी संपादीत केलेल्या शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत**

**(४६) १४२७४ (०८-०४-२०१५). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लघु पाटबंधारे विभाग भंडारा यांनी फुटाळा तलावाच्या कालव्याचे काम केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त कालव्यात शेतक-यांची जमीन संपादीत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कालव्यात जमिनी गेलेल्या शेतक-यांना मोबदला मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-०७-२०१५) :** (१) होय,

(२) होय, फुटाळा पाझर तलावाच्या कालव्यासाठी एकूण २.६० हे आरे जमीनीचे संपादन केले आहे

(३) होय,

(४) व (५) सध्या केंद्र शासनाचा नवीन भूसंपादन कायदा आस्त्विात आला असून या कायद्यानुसार कार्यवाही विचारधीन आहे.

---

**देहरजी मध्यम प्रकल्पाच्या अंतर्गत देहरजी नदी पात्रात ६, पिंजाळ नदी पात्रात ८, व वैतरणा नदी पात्रात २२ बंधारे बांधण्यासाठीच्या कामाचे सर्व्हेक्षण करण्याबाबत**

**(४७) १४४२३ (०८-०४-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देहरजी मध्यम प्रकल्पाच्या अंतर्गत देहरजी नदी पात्रात ६, पिंजाळ नदी पात्रात ८, व वैतरणा नदी पात्रात २२ बंधारे बांधण्यासाठीच्या कामाचे सर्व्हेक्षण करणे व त्यामधून उपलब्ध होणारे पाणी वसई-विरार शहर महापालिकेसाठी आरक्षित करण्यात यावे या मागणीचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालीन माजी उपमुख्यमंत्री यांस दिनांक १७ जुलै, २०१४ रोजी देण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाद्वारे कोणत्या मागण्या शासनाकडे करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, सदरहू प्रस्तावाची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :** (१) हे खरे नाही

तथापि, मा.श्री. क्षितिज ठाकुर, वि.स.स यांनी दि. १३/०८/२०१४ चे पत्रान्वये तत्कालीन उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना निवेदन दिले आहे,

(२) सदर निवेदनाद्वारे देहरजी व २२ बंधारे, कवडास व सुसरी पाणी पुरवठ प्रकल्पासंदर्भात चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करुन सहकार्य करण्याबाबत विनंती केली होती,

(३) मागणी केलेल्या एकूण २२ बंधाऱ्यापैकी देहरजी नदीवर ७ बंधारे, पिंजाळ नदीवर ४ बंधारे व वैतरणा नदीवर २ असे १३ बंधाऱ्याचे सर्वेक्षण करण्यात आले, उर्वरित ९ बंधारे प्राथमिक सर्वेक्षणानुसार अव्यवहार्य आढळल्याचे दिसून आले, सदर बंधाऱ्याद्वारे वसई विरार महानगरपालिकेस उपलब्ध करुन द्यावयाच्या पिण्यासाठी पाण्याचे आरक्षणाबाबत विहीत नमुन्यातील मागणी कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचेकडे प्राप्त झालेली नाही, त्यांना प्राप्त झाल्यावर त्यावर पुढील उचित कार्यवाही करण्यात येईल,

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाथरी (जि.परभणी) येथील जायकवाडी वसाहती मधील गाळे व गोडावून भाडेतत्वावर देण्यात आल्याबाबत**

**(४८) १५१६९ (०९-०४-२०१५). श्री.मोहन फड (पाथरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाथरी (जि.परभणी) येथील जायकवाडी वसाहती मधील गाळे व गोडावून कोणताही करार न करता व भाडे निश्चित न करता काही संस्थांना देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणताही करार व भाडे निश्चिती शिवाय गाळे व गोडावून संस्थांना देण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुषंगाने अशा प्रकारे शासनाच्या जागा बेकायदेशीरपणे संस्थांना वाटप करणा-या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, संस्थांकडून जागेच्या वापराचे भाडे वसूल करुन गाळे व गोडावून शासनाकडे परत घेण्याच्या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे,
पाथरी जि. परभणी येथील जायकवाडी वसाहतीतील जागा तीन शैक्षणिक संस्थाना देण्यात आली होती, पैकी एका संस्थेस करारनामा करुन नियमीत भाडे वसूल करण्यात येते. दुसरी संस्था बंद पडल्याने जागा ताब्यात दिली नाही. तिसऱ्या संस्थेच्या जागेचे मुल्यांकन करुन वार्षिक भाडे निश्चित करण्याची कार्यवाही चालू आहे. त्यानंतर त्यांचेकडून थकबाकीसह भाडे वसूल करण्यात येईल,
(३) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांनी मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, औरंगाबाद यांचेकडून चौकशी अहवाल मागवला आहे,
(४) याबाबतची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येत आहे,
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिंगोली व वाशीम जिल्ह्याच्या सिमेवरील पेनगंगा नदीवरील**
**बॅरेजेसची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४९) १५५५८ (०९-०४-२०१५). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली व वाशीम जिल्ह्याच्या सिमेवरील पेनगंगा नदीवरील बॅरेजेसची कामे मुदत संपल्यानंतरही अपूर्ण आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बॅरेजेसची कामे अपूर्ण असण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) तसेच, सदर बॅरेजेची कामे निश्चित किती कालावधीत पूर्ण करण्यात येतील ?

**श्री. गिरीष महाजन (२८-०७-२०१५) :** (१) होय,
(२) ११ बॅरेजेससाठी आवश्यक जमिनीची भूसंपादन प्रक्रिया, बुडीत क्षेत्रातील विदयुत वाहिन्या स्थलांतरीत करण्याचे प्रलंबित कामकाज व सुधारीत प्रकल्प अहवाल अदयावत दरसूचीने तयार करण्याचे कामकाज क्षेत्रीय स्तरावर प्रलंबित असणे,
(३) वर नमूद अडचणी दूर करुन सदर ११ बॅरेजेसची कामे जून २०१७ अखरे पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

---

## कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण व महिला बालकल्याणामार्फत जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना सायकली देण्याच्या प्रस्तावाबाबत

**(५०) १६१८० (०९-०४-२०१५). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण व महिला बालकल्याण विभगामार्फत जिल्हा परिषदेच्या शालेय शिक्षण घेणा-या मुलांना सायकली देण्याचा प्रस्ताव जिल्हा परिषदेच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेतला आहे काय, त्याचे स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने सायकल खरेदीसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्यापही या प्रस्तावावर निर्णय घेतला नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१९-०५-२०१५) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) शासन निर्णयातील तरतूदीनुसार शासनाकडील दिनांक २१ जानेवारी, २०१५ रोजी दरकरार उपलब्ध झाल्याने, दरकरारानुसार सायकल खरेदी केलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.